


संगमनेर । अकोले । कोपरगाव । राहाता । श्रीरामपूर । राहुरी । नेवासा । शेवगाव येथून एकाच वेळी प्रसिध्द..

बांधिलकी जनहिताची

# नायक

सायं.दैनिक

संपादक : गोरक्षनाथ मदने | कार्यकारी संपादक : श्याम तिवारी

Sangamner | MAHMAR/2018/75654 | वर्ष ८ | अंक ५३ | २८/६/२०२५ (दैनिक) | किंमत रु.२/- | पाने ४










# पळा रं.. पळाऽ.. खाडे आले बघा!

## अवैध व्यावसायिकांची पळापळ

## ट्रॅक्टर चालवित थेट नदीपात्रात

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

तत्कालीन पोलीस अधिक्षक कृष्णप्रकाश यांच्यानंतर जिल्ह्यातील धडाकेबाज कारवायांना लागलेली दीर्घकालीन ओहोटी भरतीत रुपांतरीत होत असल्याचे चित्र गेल्याकाही दिवसांपासून जिल्ह्यात दिसू लागले आहे. नूतन पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांच्या आदेशान्वये परिविक्षाधीन पोलीस उपअधिक्षक संतोष खाडे यांनी गुन्हेगारी वर्तुळात धिंगाणा घातला असून जुगार, मटका, गुटख्यानंतर आता जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात फोफावलेल्या वाळू तस्करीकडे आपला मोर्चा वळवला आहे. त्यासाठी त्यांनी चक्क वेशांतर करीत स्वतःच ट्रॅक्टर चालवित नदीपात्र गाठून वाळू तस्करांच्या जागेवरच मुसक्या आवळल्या. या धडाकेबाज कारवाईत पोलिसांनी सुमारे ७६ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यासह नऊ जणांवर कारवाई केली आहे. सदरची कारवाई नेवासा तालुक्यात झाली असली तरी त्यातून जिल्ह्यातील वाळू तस्करांच्या छाताडात धस्स झालं असून रात्रीच्या अंधारात कोणत्याही चारचाकीचा प्रकाश दिसताच नद्यांच्या पात्रातून 'पळा रं.. पळाऽ खाडे आले बघा' अशा हाकाट्या कानावर पडू लागल्या आहेत. या धडाकेबाज कारवायांमधून गेल्याकाही वर्षात मलिन झालेली पोलिसांची प्रतिमा सुधारण्यास मदत होणार आहे, मात्र यात 'सातत्य' राहील की, नेहमीप्रमाणे 'पहिले पाढे' याबाबत साशंकता कायम आहे.



साखर उद्योगाने भरभराटीला आलेल्या अहिल्यानगर जिल्ह्याला गुन्हेगारीचाही मोठा इतिहास आहे. जिल्ह्याचा प्रचंड भौगोलिक विस्तार असल्याने उत्तर आणि दक्षिण अशा दोनभागात विभागलेल्या जिल्ह्याची हद्द मुंबई-ठाण्यासारख्या महानगरांसह पुणे, सोलापूर, नाशिक, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्राला जावून भिडते. जिल्ह्यातून अनेक महत्त्वाचे महामार्ग आणि सोबतच लोहमार्गही जातात. शिर्डी, शनीशिंगणापूर, नेवासा, पाथर्डी, कर्जत, अहिल्यानगर यासारखी धार्मिक आणि अकोल्यासारखी पर्यटन स्थळे असल्याने देशभरातील नागरीकांची वर्दळही जिल्ह्यात नेहमीच बघायला मिळते. अशा स्थितीत जिल्ह्याची कायदा व सुव्यवस्था कायम ठेवून गुन्हेगारी कारवाया आणि अवैध व्यवसायांवर नियंत्रण मिळवणे मोठे जिकरीचे काम आहे. प्रचंड विस्ताराच्या कारणाने जिल्ह्याचे दोन प्रशासकीय भाग आणि सतरा पोलीस ठाणी असूनही अपवाद वगळता गुन्हेगारी घटना व अवैध व्यवसायाचे उच्चाटण करण्यात कोणत्याही पोलीस अधिक्षकांना आजवर यश आलेले नाही.

यापूर्वी जिल्ह्यात पोलीस अधिक्षक म्हणून काम केलेल्या विश्वास नांगरे-पाटील यांनी २००४-०६ या आपल्या कार्यकाळात गुन्हेगारी घटनांवर (पान ३ वर)



■ गेल्याकाही वर्षात जिल्ह्यात अवैध व्यवसायांचे स्तोम माजल्याने गुन्हेगारी घटनांचा आलेख उंचावत गेला आहे. त्यातून पोलिसांच्या कार्यक्षमतेवरही परिणाम झाल्याने खून, दरोडे, चोऱ्या, घरफोड्या, दुचाकीवरुन येवून सोनसाखळ्या लांबवण्याचे प्रकार या सारख्या असंख्य घटना घडूनही त्यातील बहुतेक प्रकरणांची उकल करण्यात पोलीस अपयशी ठरले आहेत. त्यामुळे गुन्हेगारांचे मनोधैर्य शिगेला पोहोचल्याने जिल्ह्यातील सामाजिक शांततेत बाधा निर्माण झाली आहे. त्यामुळे सर्वसामान्यांच्या मनात पोलिसांविषयी अविश्वासाचे ढग जमा झाले आहेत, नूतन पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांच्या धडाकेबाज भूमिकेने ते निवळण्याची शक्यता असली तरीही पोलिसांच्या कारवाईतील सातत्याबाबत मात्र साशंकता कायम आहे.

## रानभाज्यांना बाजारपेठ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार : आ.लहामटे

**नायक वृत्तसेवा, अकोले**

तालुक्याच्या आदिवासी भागातील रानभाज्यांचा महोत्सव पाहुन मी अक्षरशः भारावून गेलो, चाव्या, तेरा फांद्याची भाजी, शेवग्याच्या पानांची भाजी, कोळु, चित्रुकांची भाजी मी पहिल्यांदाच पाहिली, या भाज्या कधी खाल्ल्या नव्हत्या.

अनेक ठिकाणी रासायनिक खतांचा वापर करून भाज्या पिकवल्या जातात, मात्र नैसर्गिकरित्या (पान ३ वर)



## अवैधरित्या राहणाऱे तीन बांगलादेशी नागरिक ताब्यात

**नायक वृत्तसेवा, अहिल्यानगर**

बनावट आधार कार्ड व पॅन कार्डचा वापर करत अवैद्यरित्या राहणाऱ्या तीन बांगलादेशी नागरिकांना एमआयडीसी पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

गुरुवारी एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, एमआयडीसी पोलीस स्टेशन (पान ३ वर)




## रेशनिंगचा ४०० गोण्या तांदूळ पकडला!

### ३० लाखांचा मुद्देमाल जप्त; स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



**नायक वृत्तसेवा, अहिल्यानगर**

जिल्ह्यातील जामखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीत काळ्या बाजारात विक्रीसाठी जाणारा ४०० गोण्या रेशनिंगचा शासकीय तांदूळ जप्त करण्यात आला. स्थानिक गुन्हे शाखेने तांदळासह एकूण ३० लाखांचा मुद्देमाल जप्त केला.


याबाबत पोलिस पथकास गोपनीय माहिती मिळाली की, जामखेड ते करमाळा जाणाऱ्या रोडने टाटा २५१८ ट्रक (एमएच-१७-बीडी-८१०२) मध्ये रेशनिगचा तांदुळ काळ्या बाजारात विक्रीसाठी जाणार आहे. पथकाने मिळालेल्या माहितीवरून जामखेड करमाळा रोडवर आयटीआय जामखेड येथे तांदळाचा ट्रक पकडला. वाहनचालक सुंदर बबन घुमरे (पान ३ वर)









सुविचार : कालचा दिवस आजची स्मृती असतो आणि उद्याचा दिवस आजचे स्वप्न असतो. – खलिल जिब्रान

## मध्यस्थीची फसगत

सध्या सुरू असलेल्या इराण आणि इस्रायल संघर्षामध्ये अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अचानक दोन्ही देशांमध्ये 'सीजफायर' म्हणजेच शस्त्रसंधी झाली असण्याची घोषणा केली होती. या घोषणेमुळे सगळ्यांनाच जरा दिलासा मिळाला होता, पण हा दिलासा फार काळ टिकला नाही. दोन्ही देशांनी शस्त्रसंधी मान्य करूनसुद्धा पुन्हा एकमेकांवर हल्ले करून त्याचा भंग केला आहे, अशी माहिती खुद्द ट्रम्प यांनीच दिली आहे. त्यामुळे यावेळीही ट्रम्प यांच्या मध्यस्थीची फसगत झाल्याचे पाहायला मिळाले आहे. अमेरिकेची ही शस्त्रसंधी आम्हाला मान्य नसल्याची स्पष्टोक्ती इराणकडून आली आहे. त्याचवेळी इराणचे संरक्षण मंत्री आणि परराष्ट्र व्यवहार मंत्री या दोघांनीही अमेरिकेच्या घोषणेबाबत असहमती व्यक्त करून इस्रायलला नेस्तनाबूत करण्याचा आपला इरादा पुन्हा व्यक्त केला आहे. मात्र तिकडे इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू हे या शस्त्रसंधीसाठी फार उत्सुक असल्याचे दिसले. डोनाल्ड ट्रम्प यांनी केलेल्या शस्त्रसंधीच्या घोषणेचे त्यांनी स्वागत तर केलेच; पण त्याच वेळेला त्यांनी ट्रम्प यांचे आभार पण मानले आहेत. या बातम्या सुरू असतानाच दोन्ही देशांनी शस्त्रसंधीनंतरही एकमेकांवरचे हल्ले सुरूच ठेवल्याचे लक्षात आल्यानंतर ट्रम्प यांची ही शस्त्रसंधीची घोषणा हवेतच विरली आहे. इस्रायल आणि इराण या दोघांनीही एकमेकांवर शस्त्रसंधीचा भंग केल्याचा आरोप ट्रम्प यांनीच केला आहे. इस्रायलने शस्त्रसंधी तत्काळ मान्य केल्याचेही काही वेगळे अर्थ आंतरराष्ट्रीय पातळीवरून काढले गेले आहेत. काही तज्ज्ञांचे म्हणणे असे आहे की, आपली लष्करी ताकद पुन्हा जमवण्यासाठी इस्रायलने ही तात्पुरती शस्त्रसंधी मान्य केली आहे. इराणचे सर्वेसर्वा खामेनी यांचा खात्मा करणे हे इस्रायलचे एकमेव उद्दिष्ट आहे, पण हा संघर्ष सुरू झाल्यानंतर खामेनी यांनी कुठेतरी अज्ञातस्थळी बंकरमध्ये आश्रय घेतला आहे. त्यांचा ठावठिकाणा इस्रायली संपर्क यंत्रणांनाही लागू शकलेला नाही. त्यामुळे बंकरमध्ये लपलेल्या खामेनी यांना बाहेर काढण्यासाठी इस्रायलने हे शस्त्रसंधीचे नाटक तोंड देखल्या मान्य केले असावे, असाही एक कयास काही तज्ज्ञांनी लावला आहे. इस्रायलने मान्य केलेल्या या शस्त्रसंधीला त्यांच्या देशातीलच काही राजकीय नेत्यांचा विरोध असल्याचेही दिसून आले आहे. त्यांच्या देशातील काही राजकीय व्यक्तींचे म्हणणे असे आहे की, इराण हा आता जखमी झालेला वाघ असून त्याला असे जखमी अवस्थेत सोडून देणे इस्रायलसाठी घातक ठरणार आहे, त्यामुळे इस्रायलने आता तातडीची शस्त्रसंधी मान्य करण्याची गरज नाही. थोडक्यात काय तर, ही तथाकथित शस्त्रसंधी अधांतरीच असल्याचे आजचे तरी चित्र आहे. हे दोन्ही देश एकमेकांचा पूर्ण बदला घेतल्याखेरीज शांत राहण्याच्या मनःस्थितीत नाहीत. त्या दोन्ही देशांना ट्रम्प यांनी स्पष्ट शब्दांत शांतता राखण्यासाठी धमकावले आहे, पण त्यांच्या या धमकीलाही हे दोन्ही देश धूप घालायला तयार नाहीत. आज अचानक झालेल्या शस्त्रसंधीची जी काही कारणे पुढे आली आहेत त्यातले एक महत्त्वाचे कारण असे आहे की, रशियाने इराणला अण्वस्त्र पुरवण्याची तयारी दर्शवली होती, त्यातून अणुयुद्धाचा धोका उद्भवणार असल्याने अमेरिकेच्या मध्यस्थीने दोन्ही देशांपुढे हा शांततेचा प्रस्ताव ठेवला गेला. दुसरीकडे, चीननेही आजच दोन मालवाहू जहाजे इराणला पाठवली. त्यात मोठ्या प्रमाणावर शस्त्रसाठा असल्याचीही एक वदंता आहे. चीनने गेल्या काही दिवसांत एका गुप्त मिशन अंतर्गत इराणला पाच विमानांमधून मोठ्या प्रमाणावर याआधीच क्षेपणास्त्र साठा पुरवला आहे. या सगळ्या बातम्यांवर जागतिक पातळीवरून बारकाईने लक्ष ठेवले जात असल्याने त्याची खबर इस्रायललाही लागली. त्यामुळे त्यांनी ट्रम्प यांच्या शस्त्रसंधीचा तातडीने पुरस्कार केला. पण तरीही इराणकडून क्षेपणास्त्र मारा सुरूच राहिल्यानंतर इस्रायलनेही त्याला प्रत्युत्तर द्यायला सुरुवात केली आणि दोन्ही देशातील हा तणाव निवळण्याऐवजी कायम राहिला. हा संघर्ष फार काळ चालू ठेवल्याने आपलेच नुकसान होणार आहे, आपल्याच नागरिकांना जीविताचा धोका आहे याची पूर्ण कल्पना असूनही इराण आणि इस्रायल जराही नमती भूमिका घेताना दिसत नाहीत याचे आश्चर्य वाटल्याखेरीज राहत नाही. हा केवळ पोकळ अविर्भाव आहे, की मुळातच एकमेकांना संपवण्याची खुमखुमी आहे, याचा अजून अंदाज लागत नाही. त्यातल्या त्यात एक गोष्ट जरा बरी झाली ती ही की अमेरिकेने इराणचे आण्विक तळ उद्ध्वस्त केल्यानंतर त्याला प्रत्युत्तर म्हणून इराणने मध्यपूर्वेतील अमेरिकन तळावरही क्षेपणास्त्र हल्ला केला आहे; पण त्यामुळे अमेरिकेने पुन्हा इराणवर हल्ले करण्याबाबत संयम दाखवला आहे. त्यामुळे या संघर्षाची व्याप्ती वाढणे टळले. अन्यथा अमेरिकेकडून इराणवर पुन्हा हल्ला होण्याचा धोका होता तो टळला आहे. सद्यपरिस्थितीत आता जगाला एकच अपेक्षा आहे की ट्रम्प यांच्या मध्यस्थीने इराण आणि इस्रायल यांच्यात जर खरीच शस्त्रसंधी लागू झाली असेल, तर त्याची दोन्ही देशांनी इमाने इतबारे अंमलबजावणी करून जगाच्या जीवाला लागलेला घोर थांबवला पाहिजे. मध्यपूर्वेतील हा संघर्ष थांबवणे हे पूर्णतः ट्रम्प यांच्याच हातात आहे. ट्रम्प यांना जर खरंच जागतिक शांततेचे नोबेल पारितोषिक हवे असेल तर त्यांनी ही शांतता घडवून दाखवावीच.

# पंढरीच्या वारीत संविधानाची दिंडी

**नाचत जाऊ त्याच्या गावा रे**
**खेळीया सुख होईल विसावा!**

असे गात लाखो वारकरी पंढरपूरच्या दिशेने निघाले आहेत. जात, धर्म, पंथाचा विसर पडून आपण सर्वजण वारकरी आहोत अशी भावना पंढरीच्या वाटेवरील प्रत्येक वारकऱ्यांच्या मनामध्ये असते. कुणी कुणाला जात विचारत नाही, धर्म विचारात नाही, स्त्री आहे की पुरुष आहे असा भेद उरत नाही, असं एकच ठिकाण म्हणजे ती पंढरीची वारी! म्हणजे माणूसपणाचा निखळ अविष्कार इथे पहायला मिळतो. या वारीमध्ये एक अनोखी दिंडी गेली सात वर्ष सहभागी होते ती म्हणजे संविधान समता दिंडी!!!

संविधान समता दिंडी बद्दल अनेकांच्या मनात अनेक प्रश्न निर्माण होतात. जिथे फक्त नामाचा गजर केला जातो, भजन होतं, कीर्तन होतं, संपूर्ण अध्यात्मिक वातावरण असतं तिथे ही संविधान समता दिंडी कशी? असा प्रश्न अनेकांना पडतो. धार्मिक दिंडीमध्ये या संविधान समता दिंडीचं काय काम आहे? असा प्रश्नही विचारणारे अनेकजण आहेत.

संविधान समता दिंडीची सुरुवात कशी झाली याबद्दल अनेकांच्या मनात उत्सुकता आहे. सुरुवातीलाच म्हटल्याप्रमाणे वारकरी संप्रदाय खरंतर कोणताही भेद मानत नाही, परंतु गेल्या काही वर्षात समतेचा विचार मांडणाऱ्या वारकरी संप्रदायामध्ये विषमतेची विषारी बीजे रुजवण्यात आली आहेत. त्यामुळे त्याचे पडसाद कीर्तनातूनही उमटू लागले आहेत. विशेषतः जे तरुण कीर्तनकार वारकरी आहेत, यांच्या मनामध्ये धार्मिक उन्माद निर्माण करण्यात आला आहे. ज्या वारकरी संतांनी

यातायाती धर्म नाही विष्णू दासाश्र

असं ठणकावून सांगितलं, त्याचं संतांचा अभंग कीर्तनाला घेऊन धर्मासाठी लढले पाहिजे, धर्म वाढवला पाहिजे, त्यासाठी मरायला आणि मारायला तयार राहिलं पाहिजे, अशी चिथावणीची भाषा केली जाते. खर तर वारकरी परंपरा ही समतावादी आहे, परंतु समतेचा विचार घेऊन चालणाऱ्या मंडळींनीही वारकरी संप्रदायाकडे दुर्लक्ष केलं. दिंडी सोहळा अध्यात्मिक आहे, देवाधर्माचा आहे अशी भावना मनामध्ये ठेवून या अत्यंत महत्त्वाच्या प्रबोधनाच्या चळवळीकडे पाठ फिरवली. अगदी स्पष्ट सांगायचं झालं तर स्वतःला पुरोगामी म्हणवणारी ही मंडळी या संत विचारापासून दूर गेली. परिणामी प्रतिगामी आणि विषमतावादी मंडळींनी या समतावादी वारकरी संप्रदायामध्ये घुसखोरी करून इथे विषमतेचा विचार पेरायला सुरुवात केली. हे



सर्व लक्षात आल्यानंतर काही संविधान प्रेमी मंडळींनी पुन्हा या वारकरी संप्रदायाशी जोडून घेण्याची प्रक्रिया सुरू केली. त्यातूनच बारा वर्षांपूर्वी एक दिवस तरी वारी अनुभवावी असा उपक्रम सुरू झाला. यामध्ये समता मानणारी मंडळी एक दिवस या वारीत चालू लागले.

पुढे वेगवेगळ्या मंचावर संविधानाबद्दल वेगवेगळ्या अंगाने चर्चा होऊ लागली. अगदी कीर्तनातूनच सविधान हे हिंदू धर्माविरुद्ध केलेलं कारस्थान आहे, असे सांगितले जाऊ लागलं. तर काही लोक संविधानापेक्षा मनुस्मृती श्रेष्ठ आहे अशी मांडणी करू लागले. दिल्लीतील काही संविधान विरोधकाने तर थेट संविधान जाळून त्याच्या क्लिप्स लोकांच्या मोबाईलवर पाठवल्या, अशी संविधानाची बदनामी केली जात असताना हे संविधान मानवी जीवनाला कसे उपयुक्त आहे आणि ते संत विचारावर कसं आधारित आहे हे सागितलं पाहिजे. म्हणून संविधानाला ७० वर्षे पूर्ण होत असताना २६ नोव्हेंबर २०१९ ते २६ जानेवारी २०२० यादरम्यान संविधान आणि संत साहित्य हे कसं परस्पर पूरक आहे याची मांडणी करणारे ७० कीर्तन करण्याचा संकल्प मी केला होता. त्यावेळेला संविधान संवादक चळवळ, संविधान प्रचारात चळवळ, संविधानाचे अभ्यासक या सर्वांनीच ही संविधान कीर्तन करण्यासाठी मला महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात सहकार्य केलं.

पुढे हा विचार अधिक लोकांपर्यंत जाण्याची गरज वाटू लागली. त्यातूनच सात वर्षांपूर्वी संविधान समता दिंडीची संकल्पना पुढे आली. एक दिवस तरी वारी अनुभवावी याची तयारी सुरू झाली. तेव्हा पंढरपूरच्या वारीमध्ये मोठा वारकरी समुदाय असतो त्यांच्यासमोर हा विषय गेला पाहिजे अशी चर्चा सर्वांनी मिळून केली. त्यातूनच संविधान समता दिंडीचा जन्म झाला. संविधान समता दिंडी आणि एक दिवस तरी वारी अनुभवावी या उपक्रमामध्ये संविधानाबद्दल आस्था असणाऱ्या वेगवेगळ्या संस्था संघटना एकत्र आल्या. ज्यात राष्ट्रसेवा दल, लेक लाडकी अभियान, राष्ट्र सेवादल, मासूम युवा, अनुभव शिक्षा केंद्र, संविधान प्रचारक संविधान संवादक चळवळ या सर्व संस्था संघटनांनी एकत्र येऊन ही दिंडी सुरू केली.

आषाढीची वारी जवळ येऊ लागते तेव्हा वारकऱ्यांना पंढरपूरचे वेध लागतात तसेच गेली सात वर्ष आम्हाला संविधान समता दिंडीचे वेध लागतात. हा सगळा उपक्रम यशस्वी करण्यामध्ये सामाजिक कार्यकर्ते शरद कदम, लेक लाडकी अभियानच्या वर्षा देशपांडे, अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे माजी अध्यक्ष अविनाश पाटील, विद्यमान अध्यक्ष माधव बावगे, दत्ता पाखरे, विशाल विमल, साधना शिंदे, नागेश जाधव, दीपक देवरे, सरस्वती शिंदे, सुमित, भारत घोगरे गुरुजी, समाधान महाराज देशमुख असे असंख्य कार्यकर्ते यांच्या तयारीला लागतात. संविधान समता दिंडीचा प्रस्थान सोहळा समता भूमी भिडे वाडा पुणे येथे होतो. संविधानाचे मूल्य आणि संतांचे अभंग ओव्या याचा परस्पर असणारा संबंध दर्शवणारे पोस्टर्स, बॅनर, पत्रक तयार होतात. संतांच्या अभंग, ओव्या आणि संविधान मूल्यांनी सजलेला संविधान रथ तयार होतो. पुण्यातून जगद्गुरु तुकाराम महाराजांच्या दिंडीमध्ये सहभागी होतो. पंढरपूरमध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या मठामध्ये या संविधान समता दिंडीचा समारोप होतो. या दिंडीच्या मुक्कामाच्या ठिकाणी, दुपारच्या विसाव्याच्या ठिकाणी संविधानाची मूल्य आणि संत विचार सांगणारी पत्रकं वाटली जातात. बॅनरचे प्रदर्शन लावले जाते. कार्यकर्ते पथनाट्यातून, गीतातून संविधानाचे मूल्य आणि संविधानाचे महत्त्व वारकऱ्यांना समजून सांगतात. तर मी स्वतः संध्याकाळी एखाद्या दिंडी समोर संत साहित्यातील संविधान मूल्य या विषयावर प्रवचन करून संतांनी मांडलेले विचार आणि संविधानातील मूल्य हे एकच कसे आहेत हे वारकऱ्यांना पटवून देण्याचा प्रयत्न करतो. त्याला वारकऱ्यांच्या मधून खूपच चांगला प्रतिसाद मिळतो. दरवर्षी वेगवेगळ्या ठिकाणी या संविधान समता दिंडीला नवे कार्यकर्ते जोडले जात आहेत. संविधानाचा सांगावा जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी संविधान समता दिंडी हे माध्यम ठरत आहे आणि त्याला चांगला प्रतिसाद लाभत आहे. या दिंडीमध्ये आतापर्यंत महात्मा गांधींचे नातू तुषार गांधी, अभिनेत्री मधुरा वेलणकर, सुहिता थत्ते, शाहीर संभाजी भगत, पत्रकार रवींद्र पोखरकर, मुकेश माचकर, तुळशीदास भोईटे, संध्या नरे – पवार या सहभागी झालेले आहेत. गेल्या वर्षी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार संपूर्ण कुटुंबासह बारामती येथे सहभागी झाले होते. प्रस्थान सोहळ्याला ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचे मुख्य चोपदार राजाभाऊ महाराज, जेष्ठ कीर्तनकार ज्ञानेश्वर महाराज वाबळे, कैकाडी महाराज मठाचे प्रमुख भारत जाधव यांचे मार्गदर्शन मिळते. संतांनी पाहिलेल्या आनंदी समाजाचे स्वप्न हे संविधानाच्या माध्यमातूनच पूर्ण होऊ शकते, हा विश्वास समाजात निर्माण करण्यासाठी संविधान समता दिंडी हे अत्यंत प्रभावी माध्यम आहे असे मला वाटते, म्हणून ही दिंडी अखंड चालू राहावी अशी आम्हा सर्वांची इच्छा आहे.

**– शामसुंदर महाराज सोन्नर**

---

**मंथन**

# कडक सुरक्षा प्रणालीची गरज

**भारतातील युपीआय प्रणाली दरवर्षी ३ ट्रिलियन डॉलरहून अधिक व्यवहार हाताळते. त्यामुळे संपूर्ण प्रणालीवर प्रचंड ताण आला आहे. अशा मोठ्या संधी पाहून गुन्हेगारांचा ओघ वाढणं स्वाभाविक आहे. पेमेंट इंटरमिडीयरी कंपन्यांनी ग्राहकांना विविध फसवणुकींबद्दल आधीच सावध केलं आहे. अगदी फिशिंग अटॅक्सपासून ते सिम कार्ड क्लोनिंगसारख्या क्लिष्ट पद्धतींपर्यंत सतत ग्राहक जागृती केली जात आहे. असे असले तरीही बँकिंग प्रणाली फक्त ग्राहकांना सावध राहा या भूमिकेतून मोकळी होऊ शकत नाही. या प्रणालीसाठी अधिक कडक सुरक्षा यंत्रणा आवश्यक आहेत.**

भारतामध्ये बँक फसवणुकीच्या घटनांचा आर्थिक परिमाण तिप्पट वाढला आहे. मात्र, यामागे प्रमुख कारण म्हणजे काही जुन्या प्रकरणांची नव्याने चौकशी होऊन ती नव्या आकडेवारीत समाविष्ट झाली आहेत. पण खरी चिंतेची बाब म्हणजे गेल्या काही वर्षांत पेमेंट घोटाळ्यांमध्ये झालेली लक्षणीय वाढ. पारंपरिक मार्गाने म्हणजे बनावट कागदपत्रे दाखवून किंवा लाच देऊन कर्ज घेण्याच्या स्वरूपात बँकांना फसवले जाणे अजूनही मोठ्या प्रमाणावर घडते. पण आता ग्राहकही अधिकाधिक फसवले जात आहेत. विशेषतः डिजिटल व्यवहार करताना ही फसवणूक मोठ्या प्रमाणावर होते. रिझर्व्ह बँकेच्या ताज्या वार्षिक अहवालानुसार, सर्व फसवणुकींपैकी अर्ध्याहून अधिक फसवणुकीचे प्रकार डिजिटल व्यवहारांमध्ये कार्ड अथवा ऑनलाइन पेमेंट प्रणालींमधून झाले. या व्यवहारांचे एकूण मूल्य ४ अब्ज डॉलर्सपैकी १.४ टक्के इतकेच होते; पण ही रक्कमही कमी नाही. हे सर्व केवळ अशा प्रकरणांबाबत आहे जिथे व्यवहाराची रक्कम किमान १ लाख रुपये होती.

भारतात 'युनिफाईड पेमेंट्स इंटरफेस' या अत्यंत लोकप्रिय स्मार्टफोन–आधारित प्रणालीमुळे खूपच लहान रकमा देखील व्यक्ती ते व्यक्ती किंवा व्यक्ती ते व्यापारी स्वरूपात मोठ्या प्रमाणावर ऑनलाइन हस्तांतरित होत आहेत. या प्रणालीमधून दरवर्षी लाखो फसवणूक प्रकरणांची नोंद सरकारी आकडेवारीत होते. वर नमूद केलेली प्रकरणे ही फक्त नोंद झालेली आहेत. ज्या ग्राहकांनी सतत दक्षता ठेवली नाही, अशा श्रीमंत ठेवीदारांची रक्कम हळूहळू चोरी केली जात आहे आणि त्यांना कळतही नाही.

भारतातील युपीआय प्रणाली दरवर्षी ३ ट्रिलियन डॉलरहून अधिक व्यवहार हाताळते. त्यामुळे संपूर्ण प्रणालीवर प्रचंड ताण आला आहे. अशा मोठ्या संधी पाहून गुन्हेगारांचा ओघ वाढणं स्वाभाविक आहे. पेमेंट इंटरमिडीयरी कंपन्यांनी ग्राहकांना विविध फसवणुकींबद्दल आधीच सावध केलं आहे. अगदी फिशिंग अटॅक्सपासून ते सिम कार्ड क्लोनिंगसारख्या क्लिष्ट पद्धतींपर्यंत सतत ग्राहक जागृती केली जात आहे. असे असले तरीही बँकिंग प्रणाली फक्त ग्राहकांना सावध राहा या भूमिकेतून मोकळी होऊ शकत नाही. या प्रणालीसाठी अधिक कडक सुरक्षा यंत्रणा आवश्यक आहेत. कोणीही एक व्हर्च्युअल आयडी तयार करून ग्राहकांकडून पैसे मागू शकतो, ही मोकळीक योग्य असली तरी त्या आयडीशी संबंधित खातं खरोखरच विश्वासार्ह व्यक्तीचं असेल तरच ती सुरक्षित आहे असे म्हणता येईल. उदाहरणार्थ, ॲमेझॉन पॉकेटस् या नावाने पैसे मागणाऱ्या खात्याचं नाव जर किक्सह फिड्बीथ असं अविश्वसनीय असेल, तर ही बाब गंभीर ठरते.फसवणुकीचे प्रकार भारतापुरते मर्यादित नाहीत. ब्राझीलमधील पिक्स प्रणाली ही युपीआय प्रमाणेच जलदगतीने वाढणारी प्रणाली आहे. पण तीदेखील पिक्सगँग्ज मुळे बदनाम आहे.

भारताची परिस्थिती अधिक गुंतागुंतीची आहे. कारण इथे एक मोठ्या प्रमाणावरचा डिजिटल ओळख डेटाबेस असूनही, फसवणुकीचे प्रमाण कमी होताना दिसत नाहीये. १.४ अब्ज लोकांच्या आधार कार्ड व बायोमेट्रिक ओळख व्यवस्थेमुळे देखील फसवणूक रोखली गेलेली नाही. बँका सतत 'नो–युअर–कस्टमर' (केवायसी) प्रक्रियेमध्ये ग्राहकांकडून एकाच कागदपत्राची पुन्हा पुन्हा मागणी करतात, तरीही म्युल खात्यांचे जाळे वाढतच आहे. काही निष्पाप ग्राहकांची खाती परदेशातील सट्टेबाज, कॅसिनो किंवा क्रिकेट बेटिंगसाठी वापरली जातात, तेही क्रिप्टोकरन्सीच्या माध्यमातून ही बाब धक्कादायक आहे.

रिझर्व्ह बँकेच्या इनोव्हेशन हबने 'म्युल हंट डॉट एआय' नावाचे कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित एक साधन तयार केलं आहे. आता ते संपूर्ण डिजिटल पेमेंट्सवर नजर ठेवणाऱ्या एका 'इंटेलिजन्स प्लॅटफॉर्म'च्या प्रोटोटाइपवर काम करत आहे. मात्र, केवळ संशयास्पद व्यवहार शोधून काढणे पुरेसे नाही. स्थानिक मनी–लॉन्डरिंग कायदे बँकांना तात्काळ कारवाई किंवा ग्राहकांना रक्कम परत देण्याची मुभा देत नाहीत.

अशा स्थितीत आर्थिक क्षेत्रातील महत्वाच्या घटकांनी कायद्यात बदल होईपर्यंत वाट पाहणं परवडणार नाही. शेअर बाजार नियंत्रक सेबीने एक पाऊल पुढे टाकत, ऑक्टोबरपासून सर्व ब्रोकर्स, गुंतवणूक सल्लागार, मर्चंट बँकर्स, म्युच्युअल फंड्स यांच्यासाठी 'व्हॅलिड' अशा पुष्टीकरणासह व्हर्च्युअल पेमेंट हँडल वापरणे अनिवार्य केले आहे. पण ही सर्व पावलं तात्पुरती आहेत. केंद्र सरकारने आता डिजिटल पेमेंट्स क्षेत्र अधिक शाश्वत पातळीवर नेण्याची गरज आहे.

पाच वर्षांपूर्वी युपीआय व्यवहार विनामूल्य ठेवण्याचा निर्णय सरकारने घेतला होता, जेणेकरून डिजिटल व्यवहारांना चालना मिळेल. तो उद्देश साध्य झाला आहे. पण आता, बँका आणि गुगल पे, फोनपे यांसारख्या ॲप्सना काही प्रमाणात सेवा शुल्क आकारून त्यांच्या खर्चाची भरपाई करण्याची मुभा द्यायला हवी.

याखेरीज एनपीसीआय या सार्वजनिक क्षेत्रातील एकाधिकार संस्थेव्यतिरिक्त खाजगी क्षेत्रातील स्पर्धकांनाही प्रवेश द्यायला हवा. त्यांच्याकडून किमान शुल्क आकारून संस्थात्मक दर्जाची सुरक्षा देता येऊ शकेल. शासनाला गरिबांसाठी कॅशलेस व्यवहारांना प्रोत्साहन देणं कायम ठेवता येईल. पण इतर ग्राहकांसाठी उच्च–घनता व स्पर्धात्मक बाजार शुल्क नियंत्रणात ठेवेल आणि त्यांना अधिक सुरक्षितता व मन:शांती मिळवून देईल अशी व्यवस्था असायलाच हवी. यातून बँकांना देखील मोठा दिलासा मिळेल. पेमेंट ही एक अत्यावश्यक सेवा आहे जी त्यांना ग्राहकांना द्यावीच लागते. सध्या मात्र ही सेवा फसवणुकींच्या ओझ्यामुळे त्यांच्यासाठी डोकेदुखी ठरली आहे.

**– कमलेश गिरी**

## पान १ वरुन

### पळा रं.. पळाऽ.. खाडे आले बघा!

नियंत्रणासाठी स्वतःच वेशांतर करुन धडक कारवाया केल्या होत्या. ज्या पोलीस ठाण्यांच्या हद्दित त्यांना अवैध व्यवसाय आढळत तेथील प्रभाऱ्यांवरही त्यांनी शिस्तभंगाची कारवाई करीत त्यांना मुख्यालयात पाठवले. त्यांच्यानंतर तब्बल अर्धा तपाने कृष्णप्रकाश यांनीही जिल्ह्यात खाकीचा ‘धाक’ निर्माण केला. त्यावेळी त्यांच्यासोबत दक्षिणेच्या अप्पर अधिक्षक म्हणून कार्यरत असलेल्या ज्योतीप्रिया सिंग यांनीही एकामागून एक धडाकेबाज कारवाया करताना अवघ्या महाराष्ट्राचे लक्ष जिल्ह्याकडे वेधले होते. लांडे खून प्रकरणात भानुदास कोतकर व संदीप कोतकर यांना अटक करण्याची धमकही याच जोडीने दाखवली होती. या दोघांचा २०१०-१२ दरम्यानचा ‘तो’ कार्यकाळ सरुन आता दीड दशकाचा काळ लोटला असताना गेल्याकाही दिवसात पोलीस अधिक्षकांच्या आदेशाने उपअधिक्षकांकडून सुरु असलेल्या एकामागून एक कारवायांचा धमाका त्याची आठवण करुन देत आहे.

जिल्ह्याचा पदभार स्वीकारल्यानंतर पहिल्याच बैठकीत जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्याच्या प्रभाऱ्यांना सक्तीचे आदेश देताना एसपी सोमनाथ घार्गे यांनी ‘शिस्तभंगा’चाही उल्लेख केला होता. त्यानंतर आठ दिवसांतच त्यांच्या थेट अधिपत्याखाली असतानाही स्थानिक गुन्हे शाखेला अंधारात ठेवून त्यांनी परिविक्षाधीन पोलीस उपअधिक्षक म्हणून नेवासा पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या संतोष खाडे यांच्यावर भरवसा ठेवून त्यांच्या नेतृत्वाखाली ‘विशेष पथक’ स्थापन केले. या पथकाने गेल्या अवघ्या पंधरवड्यातच बहुचर्चित असूनही कारवाईपासून मुक्त असलेल्या जुगार, मटका आणि गुटख्याच्या व्यवसायाला लक्ष्य करीत त्यांच्यावर छापे घातले. या कारवायांमध्ये कोणाचाही मुलाहिजा न ठेवता गुन्हे दाखल झाल्याने या कारवाया प्रातिनिधीक ठरुन त्याचा जिल्हाभर परिणाम झाल्याचे बघायला मिळाले.

विशेष पथकाकडून अचानक छापेमारी होत असल्याच्या धास्तीने धंदा बंद ठेवून अनेक अवैध व्यावसायिक ‘गायब’ होत असताना रात्रीच्या अंधारात चालणारा वाळू तस्करांचा खेळ मात्र जिल्हाभर सुरुच आहे. विशेष पथकाचे प्रमुख संतोष खाडे आपल्या पथकासह बुधवारी दुपारी दोनच्या सुमारास ज्ञानेश्वर मंदिराजवळून जात असताना त्यांना विनाक्रमांकाचा वाळू भरलेला ट्रॅक्टर दिसल्यानंतर त्यांनी त्याला थांबवून चौकशी केली असता गोधेगावजवळील गोदावरी नदीपात्रातून वाळू उपसा सुरु असल्याचे त्यांना समजले. मात्र सदरचा परिसर काटवनाचा आणि तस्करांना पळून जाण्यासाठी असंख्य रस्ते असलेला होता. त्यामुळे पोलीस उपाधिक्षक खाडे यांनी वेशांतर करीत चक्क पकडलेल्या ट्रॅक्टरचे स्टेअरिंग हाती घेतले. हा प्रकार पथकातील अन्य सदस्यांनाही आचंबित करणारा होता. त्यानंतर त्यांनी पथकातील दोघा-तिघांना मजूर असल्याचे भासवण्यासाठी ट्रॉलीत बसवून थेट गोदावरीचे पात्र गाठले.

यावेळी या परिसरात तब्बल अर्धाडझन ट्रॅक्टरमध्ये जेसीबीच्या मदतीने वाळू भरण्याचे काम सुरु होते. त्याचवेळी पोलीस अधिक्षकांचाही ट्रॅक्टर तेथे पोहोचला. ट्रॅक्टरचे रंगरुप पाहून सुरुवातीला तो आपल्यातीलच असल्याची खात्री पटल्याने पात्रात बिनधास्त दरोडा घालणाऱ्या तस्करांनी त्याकडे दुर्लक्ष केले. मात्र जसा ट्रॅक्टर त्यांच्याजवळ आला, तसा पाठीमागे बसलेल्या पथकातील कर्मचाऱ्यांनी ट्रॉलीतून पात्रात उड्या घेत तस्करांच्या दिशेने धाव घेतली. तोवर आपण फसल्याची जाणीव झाल्याने पात्रात असलेल्या ट्रॅक्टर व जेसीबी चालकासह सगळ्यांची एकच पळापळ सुरु झाली. मात्र पोलिसांनी सिनेस्टाईल पाठलाग करीत त्यातील प्रवीण नामदेव म्हस्के (रा.नेवासा खुर्द), विशाल दत्तात्रय ठोंबरे (वय २३) व अभिषेक भीमराव जाधव (वय २३, दोघेही रा.गोधेगाव, ता.नेवासा) या तिघांच्या मुसक्या आवळल्याच.

यावेळी या तिघांसह नदीपात्रातून पळून गेलेल्या वाळू तस्करांच्या कब्जातून सहा ट्रॅक्टर-ट्रॉली, एक जेसीबी मशिन व पाच ब्रास वाळूचा साठा असा एकूण ७५ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमालही जप्त केला. या प्रकरणी नेवासा पोलीस ठाण्यात नऊजणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या कारवाईने जिल्ह्यातील सर्वच नद्यांच्या पात्रातून अहोरात्र वाळूचोरी करणाऱ्या तस्करांमध्ये पोलिसांचा ‘धाक’ निर्माण झाला असून रात्रीच्या अंधारात पात्रालगत एखाद्याही चारचाकीचा दिवा चमकताच ‘पळा रं.. पळाऽ.. खाडे आले बघा‘ अशा हाकाट्या कानावर येवू लागल्या आहेत. विशेष पथकाकडून जिल्ह्यात एकामागून एक अवैध व्यवसायांवर सुरु असलेल्या या धडक कारवायांमुळे एकीकडे समाधान व्यक्त होत असताना दुसरीकडे ही श्रृंखला कायम राहणार की, नेहमीप्रमाणे दहशत करुन तडजोडीने त्याचा अंत होणार याबाबत मात्र जिल्हावासियांच्या मनातील साशंकता कायम आहे.

### अवैधरित्या राहणारे तीन बांगलादेशी नागरिक ताब्यात

हद्दीत पोखर्डी गावच्या शिवारात काही संशयित बांगलादेशी नागरीक कुठलाही व्हिजा अथवा परवानगी नसताना विनापरवाना घुसखोरी करुन राहत आहेत. अशी माहिती मिळाल्याने एमआडीसी पोलीस स्टेशनचे दहशतवाद विरोधी पथकातील अधिकारी व अमंलदार यांचे समवेत जाऊन खात्री केली असता पोखर्डी गावचे शिवारात वारुळे वस्ती येथील खडी क्रेशरचे जवळ एका सिमेंटचे बाधंकाम असलेल्या खोलीत तिन संशयित इसम मिळुन आले त्यांना त्यांची नाव गावे विचारली असता त्यांनी त्यांची नावे जहांगिर अबुताहेर शेख (वय-३४, रा. चातपुर ठाणा हजीगंज, राज्य चेटोग्राम बांग्लादेश), हनीफ अब्दुल खलीद शेख (वय-४०, रा. खजीर खाली थाना शेनबाग पोस्टे शेबरहाट बांग्लादेश), मुश्रफ हबीब शेख (वय-४०, रा. चातपुर ठाणा हजीगंज राज्य चेटोग्राम बाग्लादेश) असे सांगितले. त्यांना भारतात येण्याबाबत काही व्हिजा अथवा काही परवानगी असल्याबाबत विचारले असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली.

त्यांचेकडे कुठलीही परवानगी अथवा परवानगीची कागदपत्रे मिळुन आली नाहीत. त्यांचेकडे बनावट आधारकार्ड, पॅनकार्ड, व इतर बनावट कागदपत्रे मिळुन आली असुन ती जप्त करण्यात आली आहेत. सदर बांगलादेशी नागरीकांवर एमआयडीसी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### रानभाज्यांना बाजारपेठ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार : आ.लहामटे

पिकवल्या जाणाऱ्या भाज्यांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन आमदार डॉ. किरण लहामटे यांनी केले.

अकोले पंचायत समितीच्या आवारात आदिवासी भागातील रानभाज्याचा महोत्सव प्रसंगी आमदार डॉ. किरण लहामटे बोलत होते.कोळू, कुरडू, आळु, चाई, भारंगी चिचूर्डा, बडदा, कोडवळे, पात्री, शेवगा, राजगिरा, फांदभाजी, हामद, अंबाडी, आघाडा, चितप, लोथी, भोकर, मोहटी, तेरे, अमरकंद व पुदीना आदी अति दुर्मिळ रानभाज्या विक्रीसाठी आणून अकोले शहरात अनोखा रानभाज्यांचा महोत्सव भरला. अकोले तालुक्याच्च्या आदिवासी भागातील डोंगर, दऱ्या खोऱ्यांमध्ये रानभाज्यांचा रान मेव्यानी अकोले पंचायत समितीचा परिसर सध्या बहरला आहे. कोणतीही शेती न करता अथवा कोणत्याही प्रकारच्या रासायनिक खतांचा वापर न करता, निसर्गतः उगवलेल्या भाज्याना रानभाज्या म्हणतात. या भाज्या जंगलासह शेताच्या बांधावर, माळरानावर उगवतात. पावसाची रिप - रिप सुरू झाली की, रानभाज्या डोलु लागतात. भाज्यांच्या चवीसह ओषधी गुणधर्माची जाण असलेले त्यांच्या कडे पाठ फिरवित नाहीत. या भाज्यांमध्ये अनेक औषधी गुणधर्म असतात.

यामुळे रानभाज्या आवर्जून चवीने खाल्ल्या जातात. रानभाज्याचे महत्व लक्षात यावे, यासाठी आदिवासी भागातील गावामध्ये रानभाज्याचे महोत्सव भरविले जातात. अकोले तालक्याच्या आदिवासी भागातील कळसुबाई - हरिश्चंद्रगड अभयारण्य, रतनगड, अलग, मलग, कुलग, कोकणकडा, बिताका आदी परिसरात जून, जुलै, व ऑगस्ट माहिन्यात रानभाज्या मोठ्या प्रमाणात उगवतात. बारी, उडदावणे, मुतखेल, राजूर, कोतुळ, अकोले शहरात आदिवासी बांधव या भाज्यांची विक्री करतात. निसर्गप्रेमी, हौशी पर्यटक व शहरी नागरिकांना माहिती नसलेल्यांना ते विविध प्रकारच्या या रानभाज्याची माहिती सांगतात. रानभाज्या नेमकेपणाने ओळखून, त्या खुडून आदिवासी महिला शहरी भागात बाजारात विक्रीसाठी येतात, मात्र या रानभाज्यांची माहिती नसल्याने फारसे कोणी विकत घेण्यास लवकर तयार होत नाहीत. ज्यांना माहिती आहे अशीच व्यक्ती भाज्या विकत घेताना दिसतात. यावेळी आमदार डॉ. किरण लहामटे, आदिवासी विकासच्या प्रकल्प अधिकारी देवकन्या बोकड़े, प्रभारी गटविकास अधिकारी विकास चोरे, बाजार समितीचे सभापती भानुदास तिकाडे, सुरेश नवले, हेरंब कुलकर्णी, ‘उमेद’चे कुंदन कोरडे, सोमनाथ गुजाळ, ‘एकल साऊ च्या प्रतिमा कुलकर्णी, पुष्पा लहामटे, राष्ट्रवादी काँग्रेसच्या उपाध्यक्षा उज्वला राऊत आदींनी रानभाज्यांचे महत्त्व समजून घेत त्या खरेदी केल्या.

रानभाज्याबद्दल पुरेशी माहिती नसल्यामुळे बाजारात त्या विकत घेतल्या जात नाहीत. यामुळे रानभाज्या विकत घेताना शक्यतो स्थानिक आदिवासी कडूनच घ्याव्यात. त्यांच्याकडून रानभाज्यांविषयी अचूक माहिती मिळते, या भाज्या नैसर्गिक पद्धतीने वाढवलेल्या असतात. त्यांना खते वापरलेली नसतात.

### रेशनिंगचा ४०० गोण्या तांदूळ पकडला!

(वय ६०, रा.लोणी, ता. जामखेड, जि. अहिल्यानगर) यास पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

पोलिस पथकाने वाहन चालकास मुद्देमालाबाबत विचारपूस केली असता वाहन चालक हा ट्रकचा मालक असून ट्रकमधील तांदळाच्या गोण्या योगेश मोहन भंडारी (रा. जामखेड) याच्या दुकानातून घेतल्या असून विक्रीसाठी सांगली येथे घेऊन जात असल्याची माहिती सांगितली. त्यामुळे वाहन चालकाच्या ताब्यातील ५ लाख रुपये किंमतीच्या ४०० गोण्या तांदूळ, २ लाख ५० हजार रुपये किंमतीचा टाटा २५१८ कंपनीचा ट्रक (एमएच-१७-बीडी-८१०२) आदी मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे व उपविभागीय पोलीस अधिकारी कर्जत विभाग गणेश उगले यांच्या मार्गदर्शनाखाली पो. नि. दिनेश आहेर, पोलीस उप निरीक्षक अनंत सालगुडे व पोलीस अंमलदार विश्वास बेरड, बिरप्पा करमल, हृदय घोडके, रोहित मिसाळ व भगवान धुळे यांनी केली.

# पत्रकारांच्या पेन्शनची जबाबदारी ‘व्हॉईस ऑफ मीडिया’चीच : काळे

**नायक वृत्तसेवा, भुवनेश्वर**



ओडिशामधील ‘व्हॉईस ऑफ मीडिया’च्या राज्य अधिवेशनास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पत्रकारांच्या सशक्त आणि सुरक्षित भवितव्याच्या दृष्टीने आयोजित या ऐतिहासिक अधिवेशनात अनेक ठोस निर्णय घेण्यात आले. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, ओडिशामधील पत्रकारांच्या पेन्शनची जबाबदारी ‘व्हॉईस ऑफ मीडिया’ घेणार असल्याचे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे यांनी जाहीर केले.

ओडिशामध्ये ‘व्हॉईस ऑफ मीडिया’चे ५,५०० हून अधिक सदस्य असून, त्यांना एकत्र आणण्याच्या उद्देशाने आणि त्यांच्या प्रश्नांवर उपाययोजना करण्यासाठी हे अधिवेशन महत्त्वपूर्ण ठरले. खुर्दा येथे पार पडलेल्या या अधिवेशनात संस्थेचे सर्व पदाधिकारी, पत्रकार उपस्थित होते.

संदीप काळे म्हणाले, ओडिशातील पत्रकार आणि त्यांचे कुटुंबीय यांचं भविष्य सुरक्षित करण्यासाठी ‘व्हॉईस ऑफ मीडिया’ पुढे सरसावली आहे. ही चळवळ फक्त हक्कांची नाही, तर जबाबदारीची आहे. आम्ही वचनबद्ध आहोत असे ते म्हणाले.या अधिवेशनात नवीन पदाधिकाऱ्यांची नियुक्ती, तसेच ज्येष्ठ कार्यकर्त्यांची पदोन्नती करून त्यांचा केंद्रीय कार्यकारिणीत समावेश करण्यात आला. कार्यक्रमात प्रबीणा म्हचदेव, सुधीर मानसिंग, संजय अग्रवाल, सुरेंद्रनाथ पाढी, प्रभात मिश्रा, सुखांत परिदा, धनेश्वर बिदार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीमुळे अधिवेशनाचा दर्जा अधिकच उंचावला. अधिवेशनात राजकीय, सामाजिक व प्रशासकीय क्षेत्रातील मान्यवरांचीही मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. पत्रकारांच्या व्यावसायिक, सामाजिक, कौटुंबिक सुरक्षिततेसाठी ‘व्हॉईस ऑफ मीडिया’ उभ्या करीत असलेल्या या विश्वासाच्या व्यासपीठास एक नवी दिशा मिळाली आहे. पत्रकार हा देशाचा चौथा स्तंभ आहे. जर समाजाने पत्रकाराच्या सुरक्षिततेची जबाबदारी घेतली नाही, तर ‘व्हॉईस ऑफ मीडिया’ ती पूर्ण करेल, असे सांगत संदीप काळे यांनी अधिवेशनात उपस्थित सर्वांना प्रेरणा दिली.

- या अधिवेशनात प्रत्येक पत्रकारासाठी १० लाख रुपयांचा विमा, गरजू पत्रकारांच्या मुलांच्या शिक्षणासाठी आर्थिक मदत, सेवानिवृत्त पत्रकारांसाठी पेन्शन योजना, पत्रकारांच्या घरकुल योजनांसाठी पुढाकार, स्किलिंग व रिस्किलिंगसाठी प्रशिक्षण उपक्रम या सर्व मुद्द्यांवर ठराव मंजूर करण्यात आले असून, त्या संदर्भातील अधिकृत मागण्या लवकरच शासनाकडे सादर केल्या जाणार आहेत.

# राजर्षी शाहू राष्ट्रीय सन्मान पुरस्कार राहुल ढेंबरे यांना जाहीर

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

लोकराजा राजर्षी शाहु महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधत मानवतावादी सांस्कृतिक चळवळ, कोल्हापुर यांच्यावतीने सामाजिक क्षेत्रातील योगदानाबद्दल देण्यात येणारा राजर्षी शाहु राष्ट्रीय सन्मान पुरस्कार २०२५ सामाजिक क्षेत्रातील युवा नेतृत्व, शिवप्रतिष्ठाण महाराष्ट्र राज्य संघटनेचे संस्थापक प्रदेशाध्यक्ष राहुल बाजीराव ढेंबरे यांना जाहीर झाला आहे.

रविवार, दि.२९ जुन रोजी राजर्षी शाहू स्मारक भवन, कोल्हापूर येथे मान्यवरांच्या हस्ते ढेंबरे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.



शिवप्रतिष्ठाण महाराष्ट्र राज्य संघटनेच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रभर जनसामान्यांचे प्रश्न सोडविण्याचे काम राहुल ढेंबरे करत आहेत. जनसामान्यांना केंद्रबिंदू मानून त्यांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी नेहमीच आग्रही भूमिका घेण्याचे काम करण्याची पद्धती यामुळेच सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील राहुल ढेंबरे पाटील यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

# जयंतीनिमित्त राजर्षी शाहू महाराजांना अभिवादन

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

नाशिक येथील गोखले एज्युकेशन सोसायटीच्या एस एम आर के बी के ए के महिला महाविद्यालयात राजर्षी शाहू महाराज यांची १५१ वी जयंती प्राचार्या डॉ. संध्या खेडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उप प्राचार्य डॉ. नितीन सोनगीरकर होते. उप प्राचार्य डॉ सोनगिरकर, समन्वयक डॉ. सुरेश कानडे, प्रा. संजय पाबारी, प्रा. शोभा त्रिभुवन, प्रा. मैथिली लाखे, प्रा. संगीता कांबळे यांनी राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन केले. याप्रसंगी प्रा. गुलाब गायकवाड यांनी राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवनकार्याचा



परिचय आपल्या मनोगतातून व्यक्त केला. डॉ. सोनगीरकर यांनी समाजातील तळागाळातील जनतेसाठी राजर्षी शाहू महाराजांनी केलेल्या कार्याची माहिती पटवून दिली. या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या प्रमुख प्रा. भारती हिंगणे, ग्रंथपाल प्रा. यामिनी गालापूरे, कार्यालयीन अधीक्षक प्रशांत आंबेकर आदींसह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. बी. एम. मखरे यांनी केले तर आभार प्रा. तृप्ती जाधव यांनी मानले.

# दिव्यांग यादी प्रसिद्ध न करता प्रमोशन



**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

ज्या दिव्यांग बांधवांला बहु विकलांग या स्तरातून शिक्षण विस्तार अधिकारी या पदाची निवड दिली. त्याची सेवा जेष्ठता यादी प्रसिद्ध न करताच प्रमोशन कसे झाले? असा प्रश्न उपस्थित करत निवड झालेल्या व्यक्तीची तपासणी करण्यात यावी, अशी मागणी उबाठा गटाच्या दिव्यांग सहाय्य सेनेचे जिल्हाध्यक्ष जालिंदर लहामगे आणि दिव्यांग बांधवांनी निवेदनाद्वारे जिल्हा शिक्षणाधिकाऱ्याकडे केली आहे.

यासंदर्भात जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात एका दैनिकाचा संदर्भ देत लहामगे आणि दिव्यांग बांधवांनी म्हटले आहे की, दिव्यांगा बद्दल संघटनेकडे बऱ्याच तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्या व्यक्तीच्या प्रमाणपत्राबद्दल आम्हाला शंका आहे. बहु विकलांग असताना प्रमोशन झालेली ती व्यक्ती चष्मा किंवा श्रवण यंत्र वापरत नाही. अशी व्यक्ती बहु विकलांग होऊच कशी शकते? या प्रमोशन मुळे खऱ्या दिव्यांगावर अन्याय झाला आहे. त्यामुळे त्वरित त्या व्यक्तीचं प्रमाणपत्र व त्याची शारीरिक तपासणी मुंबईच्या जे जे रुणालयात व्हावी अन्यथा जिल्हा परिषद समोर संघटना घंटानाद आंदोलन करेल, असा इशारा देण्यात आला आहे. या निवेदनावर जिल्हाध्यक्ष जालिंदर लहामगे, आनंद खरात, पी. एस. आढाव, कविता सुर्यवंशी आर्दीच्या सह्या आहेत.

नायक ANCHOR

# दिव्यांग बांधवांच्या ठेवींवर मिळणार पाव टक्का अधिक व्याजदर!

## सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी बँकेचा निर्णय

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

सामाजिक बांधिलकी जोपासणाऱ्या सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सहकारी बँकेच्या संचालक मंडळाने दिव्यांग बांधवांना त्यांच्या ठेव रकमेवर पाव टक्का अधिक व्याज देण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती बँकेचे चेअरमन सुधाकर जोशी यांनी दिली.



राज्याचे माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात साहेब यांचे मार्गदर्शन आणि नेतृत्वाखाली बँक सक्षमपणे वाटचाल करत आहे.१००० कोटी रुपयांचे आसपास व्यवसाय असणाऱ्या सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी बँकेने सदैव ग्राहकाभिमुख विविध योजना राबविल्या आहेत. या सर्व योजनांना उत्कृष्ट प्रतिसाद लाभल्याने संचालक मंडळाने ग्राहक हित साधण्यासाठी दिव्यांग बांधवांसाठी ही अनोखी ठेव व्याज दर वाढ योजना आणली आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात प्रथमच दिव्यांग बांधवांसाठी निर्णय घेणारी सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी बँक ठरली आहे. बँकेने नुकतीच नाविन्यपूर्ण अशी दैनंदिन ठेव योजना सुरू केली आहे. ज्यामध्ये दैनिक ठेव प्रतिनिधी ग्राहकांकडे गेल्यानंतर व पैसे जमा केल्यानंतर ग्राहकाचे खात्यावर त्वरित पैसे जमा करण्याची सोय करण्यात आलेली आहे.

बँकेचे आजमितीस एकुण ठेवी ५९१ कोटी रुपये ठेवी आहेत. तर ३९९ कोटी रुपये कर्जे वाटप केली आहे. बँकेच्या एकुण ११ शाखा कार्यरत असुन लवकरच संगमनेर तालुक्यातील देवकौठे येथे नवीन शाखा परिसरातील ग्राहकांसाठी सुरू केली जाणार आहे. या योजनेचा लाभ दिव्यांग बांधवांनी घेण्याचे आवाहन चेअरमन सुधाकर जोशी, व्हा. चेअरमन ॲड. नानासाहेब शिंदे, मुख्य कार्यकारी अधिकारी सुशील गुजराथी व संचालक मंडळाने केले आहे.


**पाहिजेत**

दुकान कामासाठी
लेडीज, जेन्ट्स पाहिजेत
अनभुवीस जास्त प्राधान्य
आकर्षित पगार दिला जाईल.
भंडारी सिल्क ॲण्ड सारीज संगमनेर
मो.बा.७६६६८०५८१९

**पाहिजेत**

जेन्ट्स सेल्समन - २ जागा
लेडीज सेल्समन - ३ जागा
कॉम्पुटर ऑपरेटर - २ जागा
सारिका ड्रेसेस
बाजार पेठ ,संगमनेर
संपर्क- ९८२२३५८३३५




MALPANI

प्रोसेस विभागात
**कामगार भरती**
चालू आहे!

वयोगट १८ ते ३५ वर्षापर्यंत, शिक्षणाची अट नाही,
पुरुष कामगारांसाठी होस्टेलची सुविधा, कंपनी युनिफॉर्म,
नियमानुसार पी.एफ., बोनस, ई.एस.आय.सी. (शासकीय वैद्यकीय विमा)
पाल्यांसाठी मोफत पाठ्यपुस्तक योजना, सवलतीच्या दरात कॅन्टीन व
ग्राहक भांडारची सोय, या सारख्या अनेक सोई-सुविधा व सवलती
सर्व लाभांसह एकत्रीत दर (८ तासांसाठी) दैनिक वेतन रु. ५४०/-

अधिक माहितीसाठी संपर्क
मे. दामोदर जगन्नाथ मालपाणी
मालपाणी इस्टेट, अकोले रोड, ता. संगमनेर, जि. अहमदनगर
मो. ८९५६९५६६१२
मो. ९८२२६०१६५२
मो. ९५५२८८१३००


‘बांधिलकी जनहिताची नायक’ हे दैनिक मालक, मुद्रक व प्रकाशक घनश्याम हनुमानप्रसाद तिवाडी यांनी विकास प्रिंटींग ॲण्ड कॅरिअर्स प्रा.लि., प्लॉट नं. ३२, एम.आय.डी.सी. सातपूर, नाशिक येथे छापून ऐश्वर्या कॉम्प्लेक्स, तळमजला, गाळा क्रमांक बी-१०, बस स्टँडजवळ, संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर - ४२२ ६०५ येथे प्रसिद्ध केले. संपादक : गोरक्षनाथ भिमाजी मदने, कार्यकारी संपादक : श्याम तिवारी.

पाहिजेत

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल

| अ.नं | पद | जागा |
|---|---|---|
| १ | R.M.O | २ |
| २ | Bsc Nursing | २ |
| ३ | Driver Plus Receptionist | २ |
| ४ | Maintanance | २ |
| ५ | Data opretor (MJPJAY and cashless department) | २ |

पत्ता: ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ. नगर
मो. ७४९९१७६८६४, ९४२०८५४३०६
फोन:०२४२५-२२७५७५/२२७५७४

बांधिलकी जनहिताची
# नायक
MAHMAR/2018/75654 | SRP/135/2022-2024

जिथे काळजी आणि उपचार एकत्र येतात...
ताम्हाणे हॉस्पिटल
इंदिरानगर, गल्ली नं. १०, संगमनेर
डॉ. विशाल ताम्हाणे (एम.एस.-शल्य) कन्सल्टंट जनरल अँण्ड लेझर सर्जन
डॉ. रुपाली विशाल ताम्हाणे (बी.ए.एम.एस.) स्त्रीरोग / प्रसुती चिकीत्सक
Help Line : 7219 100 100
मेडिसिन
सर्जरी
लेझर सेंटर
स्त्रीरोग-प्रसुति
मुळव्याध-भगंदर-फिशर



शेरवानी शानदार.. रुबाब दिमाखदार..
लग्न म्हणजे बस्ता. बस्ता म्हणजे राजेन्द्र.

१९५९ पासून विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेन्द्र
मेन रोड, संगमनेर. फोन : 02425-225740, 7901031155

# भ्रष्टाचाराविरोधात पंचायत समितीवर मोर्चा !

## जोर्वेचे ग्रामस्थ आक्रमक; चौकशी न झाल्यास उपोषणाचा इशारा

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**




मागील तीन वर्षापासून तालुक्यातील जोर्वे ग्रामपंचायतीवर विखे गटाची सत्ता असून लाखो रुपयांच्या वस्तूची खरेदी दाखवली गेली आहे मात्र या वस्तू गावात आलेल्या नाहीत. याचबरोबर ग्रामपंचायत मध्ये अनागोंदी कारभार सुरू असून मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला असल्याचे सांगत, ग्रामस्थांनी वेळोवेळी आंदोलने करूनही प्रशासनाने दखल न घेतल्याने जोर्वेच्या ग्रामस्थांनी आक्रमक होत पंचायत समितीवर घेराव आंदोलन करून भ्रष्टाचाराचे वाभाडे काढले. या भ्रष्टाचाराची एक महिन्यांमध्ये चौकशी न झाल्यास आमरण उपोषणाचा इशारा संतप्त ग्रामस्थांनी दिला आहे.

जोर्वे ग्रामपंचायत मधील भ्रष्टाचाराच्या विरोधात कोणतीही कारवाई होत नसल्याने ग्रामस्थांनी गुरुवारी पंचायत समितीला घेराव घातला. यावेळी उपसरपंच बादशहा बोरकर, माणिक यादव, सुरेश थोरात, आण्णासाहेब थोरात, हौशीराम दिघे, किसन खैरे, दिगंबर इंगळे, संदीप काकड, रावसाहेब दिघे, रावसाहेब काकड, बाळासाहेब चव्हाण, जालिंदर जोर्वेकर, सागर यादव, राजू बलसाने, संजय थोरात, सुखदेव चव्हाण, पुंजाहरी दिघे, हरिभाऊ इंगळे, सोपान कोल्हे, गोरख काकड, संतोष जाधव, संपत थोरात, विठ्ठल काकड, राजू शेख, राहुल बोरकर, अनिल गायकवाड, रावसाहेब यादव, सागर भवर, भाऊसाहेब दिघे, प्रमोद इंगळे, डॉ. प्रवीण काकड, अक्षय दिघे, बंटी यादव, गणेश इंगळे, योगेश जोशी, वसंत बोरकर, संदीप काकड, संदीप इंगळे, अनिल थोरात, अमोल क्षीरसागर, विद्रोही संघटनेचे अध्यक्ष भास्कर बर्डे, मीनाक्षी थोरात, मनीषा दिघे, संगीता थोरात, मंगल काकड,जयश्री दिघे, मंगल दिघे, लता बर्डे, ज्योती थोरात, अनिता काकड आदि उपस्थित होते.

जोर्वे गावांमध्ये सध्या विखे प्रणित आघाडीची सत्ता आहे. मागील तीन वर्षांमध्ये ग्रामपंचायत मध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला असून अनागोंदी कारभार झाला आहे. लाखो रुपयांच्या वस्तू खरेदी झाल्या असून त्या गावांमध्ये आलेल्या नाहीत. याचबरोबर रस्त्यांची कामे दाखवली आहेत मात्र ते रस्ते झाले नाहीत. लाखो रुपयांची बाकडे खरेदी झाली असून ती दिसत नाहीत. कुंड्यांची खरेदी केलेली आहे. येणाऱ्या महिन्यांमध्ये जर या संपूर्ण भ्रष्टाचाराची चौकशी होऊन दोषींवर कारवाई झाली नाही तर पंचायत समिती समोर संपूर्ण गाव आमरण उपोषण करेल असा इशारा समस्त ग्रामस्थांनी दिला आहे.

# विकास कामे पहावत नसल्याने भ्रष्टाचाराचे आरोप!

## आरोप करणाऱ्यांवर कारवाई करा : जोर्वे ग्रामस्थ

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**



ज्यांना चाळीस वर्षे सत्ता असूनही ४० कामे जमली नाहीत आणि आता गावातील विकासकामे जलसंपदामंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून सुरू आहेत. हा चालू असलेला विकासकामांचा वाढता आलेख काहींना झेपत नसल्याने नाहक भ्रष्टाचाराचे आरोप करत आहे. या सर्व आरोपांची लवकरात लवकर चौकशी करावी. जर आरोप सिद्ध झाले नाही तर आरोप करणार्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर्वे ग्रामपंचायतीच्या सत्ताधारी विखे गटाने पंचायत समितीचे गटविकास अधिकारी राजेंद्र ठाकूर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.

जोर्वे येथील सत्ताधारी विखे गटाच्या कार्यकर्त्यांसह ग्रामस्थांनी गटविकास अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, जोर्वे गावामध्ये ग्रामपंचायत कार्यालय, ट्रॅक्टर, ट्रॉली, टँकर, ब्लोअर, रुग्णवाहिका, दवाखाना, अमररथ, पथ दिवे, सौरदिवे, गटारी, विजेचे रोहित्र, पाणीपुरवठा, सभामंडप, रस्ते,वैयक्तिक लाभाच्या योजना अशी विविध प्रकारची विकासकामे पूर्ण झाली आहेत. तर काही विकास कामे चालू आहेत. गावातील मुख्य चौकात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे काम सुरू होणार आहे. या गावात सुरू असणारी विकास कामे विरोधी थोरात गटातील नेत्यांना पाहवत नसल्यामुळे ते सत्ताधारी विखे गटावर भ्रष्टाचाराचा आरोप करुन समाज माध्यमांवर बदनामी करण्याचे काम करत आहे. त्यामुळे विरोधकांनी जे सत्ताधारी विखे गटावर बिनबुडाचे भ्रष्टाचाराचे आरोप केलेले आहे त्याची चौकशी व्हावी अशी मागणी पंचायत समिती प्रशासनाला सत्ताधारी जोर्वेच्या सरपंच प्रिती दिघे, शिवाजी कोल्हे, बाबासाहेब काकड, सचिन दिघे, संपतराव राक्षे, हरीष जोर्वेकर, प्रकाश काकड, विशाल थोरात, शिवाजी काकड, नंदू थोरात, रमेश इंगळे, प्रशांत इंगळे, सचिन मोकळ, अभिषेक चव्हाण, बाबासाहेब थोरात, जगदीश इंगळे, भाऊसाहेब वाकचौरे, रविंद्र गाडेकर, बंडू इंगळे, मिरा थोरात, लता काकड, मिना इंगळे, वनिता चव्हाण, अलका चव्हाण, अनिता लोणारी, दुर्गा लोणारी, निशिगंधा इंगळे, सुनीता बर्डे, अनिता मोरे,रंजना जाधव, सरला जोर्वेकर आदींनी गटविकास अधिकारी राजेंद्र ठाकूर यांच्याकडे केली आहे.

# आणीबाणीचा काळ म्हणजे खऱ्या कार्यकर्त्यांची ओळख : गुणे

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**




आणीबाणी हा भारताच्या इतिहासामधील १९७५ – ७७ दरम्यानचा २१ महिन्यांचा काळ होता. या काळात तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी संविधानाची पायमल्ली करत देशव्यापी आणीबाणी जाहीर केली होती, तो दिवस आजही काळा दिवस म्हणून मानला जातो असे भाजपच्या शहराध्यक्षा पायल ताजणे यावेळी म्हणाल्या.

आणीबाणी जाहीर करून देशभर एक प्रकारची लढाई सुरू झाली होती. ही लढाई केवळ राजकीय नव्हे, तर लोकशाही टिकवण्यासाठीची होती. संकटात खंबीरपणे उभे राहणारे कार्यकर्तेच खरे असतात असे प्रतिपादन स्मिता गुणे यांनी केले.

आणीबाणीला ५० वर्षे पुर्ण झाल्याच्या निमित्ताने जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली भाजप संगमनेर मंडलाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात स्मिता गुणे बोलत होत्या. यावेळी दिनेश सोमाणी, डॉ. अशोक इथापे, राजेंद्र सांगळे, सिताराम मोहरीकर, भारत गवळी, ज्योती भोर आदींसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

स्मिता गुणे यावेळी म्हणाल्या, ज्यांनी संकटात प्रत्यक्ष कृती केली तेच खरे कार्यकर्ते होते. गावोगावी लोकांनी ओळखले की, कोण खरे आहेत आणि कोण केवळ बोलघेवडे. आजही अशी लोकं जेव्हा खऱ्या कार्यकर्त्यांसमोर येतात, तेव्हा त्यांचं खरं स्वरूप उघड होतं. आपल्याला सकारात्मक वातावरणात काम करता येतं, ही जमेची बाजू आहे, मात्र संघर्षाचा काळ विसरू नका असे ते म्हणाल्या.

# आश्वी बुद्रुक सोसायटी थोरात गटाचे गायकवाड विजयी

**नायक वृत्तसेवा, आश्वी**



संगमनेर तालुक्यातील आश्वी बुद्रुक येथील विविध कार्यकारी सेवा सोसायटीच्या एका रिक्त असलेल्या जागेसाठी दोन्ही उमेदवारांना समान मते मिळाल्याने चिठ्ठीतुन झालेल्या निवडणुकीत माजी मंत्री बाळासाहेब थोरात गटाच्या उमेदवाराचा विजय झाला.

आश्वी बुद्रुक सोसायटीत एकुण १३ सदस्य असुन सात सदस्य मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या गटाचे असुन सत्ताही विखे गटाची आहे. तर सहा सदस्य माजी मंत्री बाळासाहेब थोरात गटाचे आहेत. ना. विखे गटाचे कैलास मुळे यांचे अपघाती निधन झाल्यामुळे ही जागा रिक्त झाली होती. गुरूवार दि २६ जुन रोजी एक सदस्य निवडीसाठी संगमनेर येथील उपनिबंधक कार्यालयात निवडणुक अधिकारी राजेद्र वाकचौरे यांच्या उपस्थितीत निवडणुक प्रक्रिया पार पडली. या रिक्त जागेसाठी थोरात गटाकडुन वेणुनाथ गायकवाड तर विखे गटाकडून कै. कैलास मुळे यांचे बंधु राजेंद्र मुळे यांना उमेदवारी देण्यात आली. दोन्ही गटाकडुन माघार न झाल्याने निवडणुक प्रक्रिया पार पडली. यात दोघांनाही समसमान म्हणजे प्रत्येकी सहा मते पडली. शेवटी चिठ्ठी काढण्याचा निर्णय होऊन यात थोरात गटाचे वेणुनाथ गायकवाड यांना नशीबाने साथ दिल्याने चिठ्ठीव्दारे ते विजयी झाले.

# नाशिकमध्ये रंगणार तिसरे 'सह्याद्री मित्र संमेलन'!

## 'भटकंती' फेम मिलिंद गुणाजींची उपस्थिती

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

महाराष्ट्रातील गड-किल्ले आणि डोंगर भ्रमंती करणाऱ्यांसाठी आनंदाची बातमी आहे. तिसरे सह्याद्री मित्र संमेलन यंदा ५ आणि ६ जुलै रोजी नाशिक येथे गुरुदक्षिणा सभागृह, कॉलेज रोड येथे आयोजित करण्यात आले असल्याची माहिती या मेळाव्याचे संयोजक संजय अमृतकर यांनी दिली.

संमेलनाचे स्वागताध्यक्ष अ‍ॅड. नितीन ठाकरे असून, प्रसिद्ध अभिनेते आणि दुर्गप्रेमी मिलिंद गुणाजी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. हे संमेलन महाराष्ट्रातील डोंगरभटके आणि गिर्यारोहक यांना एकत्र आणून अनुभव आणि माहितीची देवाणघेवाण करण्यासाठी एक उत्तम व्यासपीठ उपलब्ध करून देईल. संमेलनाच्या निमित्ताने अनेक उपक्रम आयोजित करण्यात आले आहेत. १५ जून रोजी ब्रह्मगिरी स्वच्छता अभियान यशस्वीरित्या राबविण्यात आले, ज्यात दोनशेहून अधिक उत्साही लोकांनी सहभाग घेऊन ब्रह्मगिरीची स्वच्छता केली. तसेच, २२ जून रोजी पट्टा उर्फ विश्रामगड किल्ल्यावर भ्रमंतीचे आयोजन केले होते, ज्यात सुमारे साडेचारशे डोंगरप्रेमींनी सहभाग घेतला. याशिवाय, २९ जून रोजी 'ग्रीन नाशिक' या संकल्पनेखाली नाशिक शहरात सायकल फेरीचे आयोजन करण्यात आले आहे.या संमेलनात दुर्ग संवर्धन आणि गिरीभ्रमणाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या संस्था व व्यक्तींचा सन्मान केला जातो. यंदाचा 'सह्याद्री रत्न' पुरस्कार ज्येष्ठ गिर्यारोहक उमेश झिरपे यांना देण्यात येणार आहे. याप्रसंगी 'सह्याद्री रत्न' ही माहितीपूर्ण स्मरणिका देखील प्रकाशित केली जाईल. संमेलनस्थळी गिरीभ्रमणविषयक साहित्य आणि माहितीचे सुमारे ५० स्टॉल्स असणार आहेत, जिथे डोंगरप्रेमींना आवश्यक माहिती आणि वस्तू एकाच छताखाली उपलब्ध होतील.

डोंगर भटक्यांनी या संमेलनात मोठ्या संख्येने सहभागी होऊन या अनोख्या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन संयोजन समितीने केले आहे.

नायक ANCHOR

# आई-वडिलांसह गुरुजनांचा आदर करा : पो.नि. थोरात

**नायक वृत्तसेवा, साकुर**



राजश्री छत्रपती शाहू महाराज जयंती निमित्ताने पोलिस निरीक्षक हेमंत थोरात यांच्या हस्ते शाहू महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. तसेच विरभद्र विद्यालयातील विद्यार्थ्यांनी अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त गावातून प्रभात फेरी काढली होती.

विद्यार्थ्यांनी आयुष्य जगत असताना चांगल्या ची संगत ठेवावी. तसेच व्यसनाधीन मित्रांपासून दूर राहत आपल्यात काय आहे ते ओळखायला शिकले पाहिजे. हे करत असताना आई-वडिलांसह गुरुजनांचा आदर करा ज्ञान मंदिरात येताना आई-वडिलांच्या पायाला स्पर्श करून या, तुमचं भविष्य नक्कीच उज्वल असेल असे मत घारगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक हेमंत थोरात यांनी व्यक्त केले.

संगमनेर तालुक्यातील साकूर येथील विरभद्र विद्यालयात व्यसनमुक्ती दिन आणि राजश्री छत्रपती शाहू महाराज जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात घारगाव पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक हेमंत थोरात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना बोलत होते. यावेळी व्यासपीठावर कामगार तलाठी शिवप्रसाद दिवेकर, पो. कॉ. प्रमोद गाडेकर, पत्रकार किरण पुरी, पत्रकार युनूस शेख, पत्रकार सहदेव जाधव, प्राचार्य बी. एम. खरात, पर्यवेक्षक आप्पा तुरकणे, एस. के. खेमनर, जी. वाय. हजारे, डी. बी. ढमढेरे, व्ही. एम. केदार, एम. ए. खेमनर, जे. बी. खेमनर, डी. के. खेमनर, प्रा. पाडेकर, श्रीमती शेख, श्रीमती केदार आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक व सुत्रसंचालन जी.वाय. हजारे यांनी केले तर आभार प्रा. पाडेकर यांनी मानले. यावेळी शिक्षक गायकवाड, वीरकर, सोनवणे, श्रीमती सरमधे, श्रीमती शेख, श्रीमती वाघुंडे, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी व विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.







कुटे हॉस्पिटल अ‍ॅण्ड लॅप्रोस्कोपी सेंटर
स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्
४० फुटी डी. पी. रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
फोन : (०२४२५) २२६६८८, २२६६८६
डॉ.सोनाली प्र. कुटे (M.B.B.S., D.A.) Physician & Anaesthetists Reg.No. 2005/093398
डॉ.प्रदीप भा. कुटे (M.S., Shalya) Laproscopic Surge & Endoscopist Reg.No. I-45801-A
• मॉड्युलर ऑपरेशन थिएटर • एसी/डिलक्स रुम्स् • महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना उपलब्ध • तज्ज्ञ डॉक्टर्स व प्रशिक्षित स्टाफ • डायलेसिस विभाग • इन्टरकॉम, टीव्ही • ९ बेडस्चा सुसज्ज आय.सी.यु. विभाग व सुसज्ज अपघात विभाग • नर्स कॉल बेल सिस्टिम • गरम पाण्यासाठी सोलर • सेंट्रल ऑक्सिजन व सक्शन • सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया • सर्व प्रकारचे मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा उपलब्ध • अत्याधुनिक सुविधा • अ‍ॅम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा ८८८ ८८८ २२२५